प्रेस नोट, दिनांक १२/०५/२०२०

# ATM Card ची माहिती शेअर केल्याने फसवणुक झालेल्या नागरिकाची १०० % रक्कम सोलापूर ग्रामीण सायबर पोलीसांनी परत मिळवून दिली.

दिनांक १६/०४/२०२० रोजी श्री. सागर सुनिल मुडके, धंदा-शेती, रा. मार्डी ता. उत्तर सोलापूर यांचे मोबाईल नंबर ९९७५६१४८१७ वर एक फोन आला. " **मैं मुंबई से बडोदा बॅक मॅनेजर बोल रहा हूं, तुम्हारा अकाउंट बहूत दिनोसे झिरो बॅलेन्सपर है, हम आप का अकाउंट लॉक कर रहे है** " त्यावरून मुडके यांनी तसे न करण्याची विनंती केली. त्यावरून मॅनेजर बोलले की, " **तुम्हे गॅरेंटी परपज के लिए पिताजी या भाई का एटीएम कार्ड नंबर की मालुमात देनी होगी.**" त्याप्रमाणे सागर यांनी भाउ अविनाश मुडके, धंदा - MSEB नौकरी यांचे एटीएम कार्ड नंबरची माहिती दिली. आणि त्यानंतर भावाच्या मोबाईल मधील आलेले OTP सांगितले. ओटीपी सांगताच भावाचे खातेतुन रक्कम रुपये ४९,९९९/- कपात झालेचे मेसेज आले. त्यानंतर अविनाश मुडके यांनी सोलापूर ग्रामीण सायबर पोलीस ठाणेस धाव घेतली.

सायबर पोलीस ठाणेचे प्रभारी सहा. पोलीस निरीक्षक रविंद्र गायकवाड यांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखुन पोहेकॉ/६१८ एस.एच. बागवान व पोना/०५ वाय. जी. पठाण यांना तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत सुचना दिल्या. पोहेकॉ/६१८ बागवान व पठाण यांनी मुडके यांचे बॅक खात्याचे स्टेटमेंट व प्राप्त एसएमएसचे अवलोकन करून सदरची रक्कम Digital Gold India Mumbai यांचे खातेवर वर्ग झाल्याचे निष्पन्न केले. त्यानंतर तात्काळ Digital Gold India नोडल अधिकारी यांचेशी संपर्क करून सदरचे व्यवहार हे फसवणुकीचे आहे, ते थांबविण्यात यावे. असे सुचनेचे पत्र पाठवुन पाठपुरावा केला. त्यानंतर भाउ अविनाश मुडके, यांचे खाते क्रंमाक ३४३२५१५९५६२ वर दिनांक ११/०५/२०२० रोजी फसवणुक झालेली संपुर्ण रक्कम रू. ४९,९९९/- परत मिळवुन देण्यात सायरब पोलीस ठाणेस यश आले.

सायबर पोलीस ठाणे मार्फत नागरिकांना विशेषत: व्यावसायिकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या खात्याची माहिती शेअर करताना जागरूक रहावे. आपल्या कार्डचा सीव्हीव्ही नंबर, OTP किंवा पासवर्ड कोणाशीही शेअर करू नये. कोणतीही बॅक फोनव्दारे आपल्या खात्याची माहिती मागत नाही. तरी नागरिकांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता सर्तक राहावे व आपल्या सोबत असे प्रकार घडल्यास तात्काळ जवळील पोलीस ठाणेस संपर्क साधावे, सदर घटनेबाबतची माहिती तात्काळ सायबर पोलीस ठाणेस कळवावी.

सदरची कारवाई मा. श्री मनोज पाटील, पोलीस अधीक्षक, मा.श्री. अतुल झेंडे, अपर पो. अधिक्षक, रविंद्र गायकवाड, सहा. पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे सफौज/ गायकवाड, पोहेकॉ/ सलीम बागवान, पोहेकॉ/ विजयकुमार पावले, पोना/ युसुफ पठाण, पोना/ व्यंकटेश मोरे, पोकॉ/ नरळे, पोकॉ/अत्तार, पोकॉ/माळी, मपोकॉ/अंबरकर, मपोकॉ/सण्णके नेमणुक सायबर पोलीस ठाणे यांनी प्रत्यक्ष कार्यवाहीत सहभाग घेतला.

प्रति,

मा. संपादक,.....

२/- सदरची बातमी आपले लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करणेस विनंती आहे.